# फौजदारी किरकोळ अर्ज २१/२०१८ मधीलनि.१ खालील आदेश

(१) अर्जदार अभिजीत विलास पवार याने सदरचा अर्ज पोलीस स्टेशन विटा शहर यांच्याकडे जप्त असलेला मुद्देमाल शेवरोलेट कंपनीची ''स्पार्क कार'' ही त्याला परत मिळणेसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये केला आहे.

## अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की:

(२) अर्जदार याचे मालकीची शेवरोलेट कंपनीची ''स्पार्क कार'' क्रं.एम.एच.१४ ई.एच.७०७३ ही अपराध क्रं. ०८/२०१८ मध्ये मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये पोलीस स्टेशन विटा शहर यांनी जप्त केलेली आहे. सदरची कार ही पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास फार मोठे नुकसान होईल. न्यायालयाने सदर ''स्पार्क कार'' ही योग्य त्या अटीवर अर्जदाराच्या ताब्यात द्यावी. अर्जदार हा न्यायालयाने लादलेल्या अटींचे पालन करण्यास तयार आहे. तरी सदर अर्ज मंजूर करावा.

(३) याकामी तपासी अधिका–याचे व सरकार पक्षाचे म्हणणे विचारण्यात आले. तपासी अधिकारी याने त्याचे म्हणणे नि.०७ कडे सादर करुन अर्जदारास सदरचे वाहन देण्यास विरोध दर्शविला आहे. तर सरकारी वकीलांनी आपले म्हणणे देवून अर्जदारास योग्य त्या अटी शर्तीवर देण्यास कथन केले आहे.

(४) सदर अर्जावर सरकार पक्षाचा व अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या समर्थनात कागदपत्रे यादी नि.०३ प्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांचे गाडीचे माहिती पत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. तसेच, सदर गाडीचे इन्शुरन्सचे कागदपत्र व अर्जदारचे आधारकार्डची छायांकित प्रत देखील दाखल केली आहे. सदर अर्जदारने दाखल केलेले प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांच्या माहितीपत्राचे व इतर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ''स्पार्क कार'' क्रं.एम.एच.१४ ई.एच.७०७३ ची नोंदणी अर्जदाराचे नावे झालेली आहे. वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की,

अर्जदार हा सदर गाडीचा मालक आहे. सदर कार ही पोलीस स्टेशनला राहिल्यास नुकसान होण्याची जास्त शक्यता आहे. सदर कार ही अर्जदारास पुढील अटींवर व सुपूर्दनामा बंधपत्रावर देणे योग्य होईल. तरी मी पुढील आदेश पारित करत आहे.

# आदेश

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार यास अपराध क्रं. ०८/२०१८ मध्ये मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये कायद्यामध्ये पोलीस स्टेशन विटा शहर यांनी जप्त केलेली शेवरोलेट कंपनीची ''स्पार्क कार'' क्रं.एम.एच.१४ ई.एच.७०७३ ही अर्जदार यांना क्षतीपूर्ती बंधपत्र रक्कम रु.५,००,०००/- (पाच लाख) चे स्विकारुन अंतरीम स्वरुपात खालील अटीवर परत देणेत यावी.

अ) जप्त ''स्पार्क कार'' क्रं.एम.एच.१४ ई.एच.७०७३ ही अर्जदारने विकू नये अगर इतर कोणत्याही मार्गाने त्याचे हस्तांतर करु नये.

ब) सदर वाहनाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये.

क) सदर वाहन न्यायालय ज्या ज्या वेळी आदेश करतील त्या त्या वेळी अर्जदारने न्यायालयात हजर करणेचे आहे.

३) अर्जदारने क्षतीपूर्ती बंधपत्र सोबत वाहनाचे चारही बाजूंनी फोटो काढून न्यायालयात दाखल करावेत.

४) जर अर्जदारने कोणत्याही एका अटीचा भंग केला तर त्याने लिहून दिलेले क्षतीपूर्ती बंधपत्र जप्त करुन बंधपत्राची रक्कम त्याचेकडून वसूल करुन सरकार जमा केली जाईल.

५) पोलीस निरीक्षक, विटा शहर, पोलीस स्टेशन यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदारास कागदपत्रांची पडताळणी करुन उपरोक्त कार ताब्यात द्यावी.

स्वाक्षरी/-

विटा (वि.सा.शिंदे)

दिनांक–२२.०१.२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा